**<u>ठळक बातम्या</u>**

- विविध उपक्रमांनी नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत, राज्यपाल सी पी राधाकृष्णन, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांच्यासह विविध मान्यवरांकडून नागरिकांना शुभेच्छा

- राज्यात भरड धान्य खरेदी अंतर्गत ऑनलाईन शेतकरी नोंदणीची मुदत १५ जानेवारीपर्यंत

- कोरेगाव भीमा इथं शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घ्यायला मोठ्या प्रमाणात जनसमुदाय

- किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांचं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन

**आणि**

- विदर्भ साहित्य संघाचे राज्यस्तरीय आणि इतर वाङ्मयीन   पुरस्कार जाहीर

**<><><><><>**

देशासह जगभरात नवीन वर्षाचं जल्लोषात स्वागत केलं जात असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**होल्ड व्हाइस कास्ट**

*भारताच्या दैदिप्यमान, सर्वसमावेशक आणि शाश्वत भविष्यासाठी एकजुटीनं कार्य करण्याच्या वचनबद्धतेला आपण पुन्हा एकदा उजाळा देऊ या, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.*

*संविधानकर्त्यांच्या स्वप्नांना साकार करत २०४७ पर्यंत विकसित भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी कार्य करण्याची हीच वेळ असल्याची आठवण उपराष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात करुन दिली आहे.*

*तर नवीन वर्षात सर्व देशवासीयांना उत्तम आरोग्य, समृद्धी, नवनवीन संधी, यश आणि आनंद मिळो, अशी शुभकामना प्रधानमंत्र्यांनी केली आहे.*

*सामाजिक विषमता दूर करून समतावादी समाज निर्माण करण्यासाठी आपण सतत प्रयत्नशील राहूया असं राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.*

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातल्या जनतेला नववर्षाच्या शुभेच्छा देताना 'महाराष्ट्र आता थांबणार नाही' असा संकल्प केला आहे. कष्टकरी, शेतकरी, कामगार आणि प्रत्येक नागरिकाच्या योगदानानं महाराष्ट्राला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.*

*'विकसित भारत' आणि 'प्रगतीशील महाराष्ट्र' घडवण्यासाठी प्रयत्न करू असा संकल्प करून जनतेच्या सुखसमृध्दीसाठी राज्य सरकार काम करेल, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. तर नवीन वर्ष जनतेला विकासाच्या नवनवीन संधी उपलब्ध करून देणारं आणि महाराष्ट्राला सर्वांगीण प्रगतीच्या वाटेवर घेऊन जाणारं ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.*

**<><><><><>**

राज्यात विविध उपक्रमांनी नववर्षाचं स्वागत झालं. विविध देवस्थानांवर नागरिकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. शिवसेनेच्या वतीनं ठाण्यात आयोजित

केलेल्या रक्तदान शिबिरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सहभाग घेत रक्तदान केलं. **धुळे** जिल्ह्यातही युवक बिरादरी आणि रक्ताशय संस्थेनं गेल्या ४१ वर्षांच्या परंपरेनुसार नववर्षाचं स्वागत करण्यासाठी रक्तदान शिबीर आयोजित केलं होतं. **नंदुरबार** शहरातल्या श्रॉफ हायस्कुलमधल्या विद्यार्थ्यांनी सामूहिक सूर्य नमस्कार घालून आरोग्य संपन्नतेचा संदेश दिला. सांगलीत काल रात्री लोकहित मंचानं सलग १८ व्या वर्षी “दारू नको दूध प्या” हा अभिनव उपक्रम राबवला.

**<><><><><>**

श्रोते हो, २०२४ या वर्षभरात आर्थिक क्षेत्रात घडलेल्या घडामोडींचा आढावा आज आपण ‘सरत्या वर्षाच्या पाऊलखुणा’ या कार्यक्रमाच्या माध्यमातून घेणार आहोत. रात्री सव्वा ७ वाजता अस्मिता वाहिनीसह, news on air हे ॲप आणि समाजमाध्यमांवर आपल्याला हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक वापराचे गॅस सिलिंडर १५ रुपयांनी स्वस्त केलं आहे. मुंबई आता १९ किलो वजनाचं LPG सिलेंडर १ हजार ७५६ रुपयांना मिळेल. घरगुती वापराचे LPG सिलिंडरच्या किंमतीत मात्र काहीही बदल झालेला नाही. त्यामुळं हे सिलिंडर ८०२ रुपये ५० पैशांना मिळेल.

**<><><><><>**

राज्यात भरड धान्य खरेदी अंतर्गत किमान आधारभूत किंमत खरेदीसाठी ऑनलाईन शेतकरी नोंदणीची मुदत येत्या १५ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे. त्यामुळे सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर नजीकच्या केंद्रामधून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी असं आवाहन अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षणमंत्री धनंजय मुंडे यांनी केलं आहे.

**<><><><>**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे यासाठी राज्याचे पहिले एआय धोरण तयार करण्याचे निर्देश माहिती आणि तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिले. माहिती तंत्रज्ञान विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. केंद्र सरकार जानेवारी २०२५ पासून वैयक्तिक नसलेल्या डेटासेट्सचे संकलन सुरू करणार आहे. यामुळे स्टार्टअप्स, कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि संशोधकांना ॲप्स विकसित करण्यासाठी, विविध भाषांची सेवा देण्यासाठी तसंच आणि विशेष सेवा देण्यासाठी उपयोग होणार आहे.

**<><><><>**

पुण्याजवळ कोरेगाव भीमा या ठिकाणी आज दोनशे सातव्या शौर्य दिनानिमित्त विजयस्तंभाचं दर्शन घ्यायला हजारोजण जमले आहेत. शहर विकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी आज शौर्य दिनानिमित्त विजय स्तंभास अभिवादन केले. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनीही आज भीमा कोरेगाव इथल्या विजयस्तंभाला अभिवादन केलं. विजयस्तंभाला अभिवादन करण्यासाठी हजारो लोकांची उपस्थिती हा संघर्ष जिवंत असल्याचे निदर्शक आहे, असं ते या वेळी म्हणाले.

**<><><><>**

**सोलापूर** जिल्ह्यात अक्कलकोट इथं ट्रक आणि स्कॉर्पिओच्या टकरीत, ४ जणांचा जागीच मृत्यू झाला तर किमान सात जण जखमी झाले. मृतांमधे दोन महिलांचा समावेश आहे. **नांदेड** जिल्ह्यातील हे सर्व जण नववर्षाच्या पहिल्याच दिवशी देवदर्शनासाठी गेले होते. गंभीर रीत्या जखमी झालेल्यांना सोलापूरच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आलं आहे.

**<><><><>**

रायगड जिल्ह्यात उरण तालुक्यातल्या दिघोडे इथं ८ जणांना अन्नातून विषबाधा झाली. उघड्यावरचे अन्नपदार्थ खाल्लानं ही विषबाधा झाली. या रुग्णांवर पनवेलमधल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

**<><><><>**

नांदेड जिल्ह्यातले किनवट विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार प्रदीप नाईक यांचं आज हैदराबाद इथं हृदयविकाराच्या धक्क्यानं निधन झालं. ते ६८ वर्षांचे होते. २००४, २००९ आणि २०१४ मध्ये झालेल्या निवडणुकीत सलग तीन वेळा त्यांनी किनवट मतदार संघात विजय मिळवला होता. त्यांच्या पार्थिवावर उद्या किनवट इथल्या दहेली तांडा या त्यांच्या मूळ गावी अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नाईक यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**<><><><>**

बीड जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालयानं आरोपी वाल्मिक कराड याला १४ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे. केज इथल्या जिल्हा रुग्णालयात काल वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर सीआयडी पथकानं त्याला केजच्या अतिरिक्त सत्र न्यायालयात हजर केलं होत.

दरम्यान संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातले इतर तीन आरोपी अद्यापही फरार आहेत. त्यांच्या अटकेच्या मागणीसाठी मस्साजोगच्या गावकऱ्यांनी पाझर तलावात जलसमाधी आंदोलन सुरु केलं आहे.

**<><><><>**

विदर्भ साहित्य संघाचे राज्यस्तरीय आणि इतर वाङ्मयीन पुरस्कार आज जाहीर झाले. राज्यस्तरीय आशा सावदेकर स्मृती साहित्य समीक्षा पुरस्कार श्रीनिवास हेमाडे यांच्या ‘तत्वभान` या ग्रंथाला बहाल करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय विदर्भ साहित्य संघ अनुवाद पुरस्कार दीपक घारे यांच्या ‘सैय्यद हैदर रक्षा -एका प्रतिभावंत चित्रकाराचा प्रवास’ या पुस्तकाला मिळाला आहे. डॉ.मा.गो.देशमुख स्मृती संतसाहित्य लेखन पुरस्कार डॉ.अलका चिडगोपकर यांना आणि पु.ल. देशपांडे स्मृती कादंबरी पुरस्कार अशोक पवार यांना जाहीर झाला आहे. याशिवाय डॉ.पद्मरेखा धनकर, संजय आर्वीकर, श्रीकांत बोजेवार आणि राधा मंगेशकर यांचाही विजेत्यांमध्ये समावेश आहे. येत्या १४ तारखेला विदर्भ साहित्य संघाच्या वर्धापन दिन समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

**<><><><><>**

मुंबई विद्यापीठानं उन्हाळी सत्राच्या विविध विद्याशाखेअंतर्गत होणाऱ्या परीक्षांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. मार्चमध्ये या परीक्षांना सुरुवात होईल. या परीक्षांना १ लाख ३८ हजार विद्यार्थी बसणार असून त्याकरता ४३९ परीक्षा केंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थ्यांचे विषय, आसन क्रमांक आणि अनुषंगिक तपशीलाबाबतची तात्पुरती प्रवेशपत्रं महाविद्यालयांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहेत, असं विद्यापीठानं कळवलं आहे.

**//<><><><><>//**